# नियमीत दिवाणी दावा क्र. ३८२/२०११ मधील नि. ११७ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादींनी प्रतिवादी क्र. ९ बाळू उर्फ बाळासाो सदाशिव मगर यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादींचे अर्जातील कथन की, प्रतिवादी क्र. ९ हे दि. ०५/०५/२०२३ रोजी मयत झाले आहेत. त्यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे वारस आहेत. प्रस्तुत दावा स्थावर मिळकतीसंबंधी असल्यामुळे सदर मयत प्रतिवादी यांचे वारस अभिलेखावर आणणे न्यायाचे व जरुरीचे झाले आहे. त्यामुळे मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळावी अशी विनंती वादींनी केली आहे.

३. प्रतिवादीच्या विधीज्ञांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल योग्य तो आदेश पारीत करावा, अशी विनंती केली आहे.

४. वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द सरस निरस मानाने वाटपासाठी व पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ९ मयत झाल्यानंतर त्यांच्या पश्चात त्यांच्या वारसांच्या स्वरुपात दावा पुढे चालू राहू शकतो. तसेच त्याच्या वारसांचे हक्क हितसंबंध दावा मिळकतीमध्ये गुंतलेले आहेत. अर्ज नामंजूर केल्यास दाव्याची श्रुंखला वाढत

जाणार आहे. याउलट, अर्ज मंजूर केल्यास इतर वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. मयत प्रतिवादी क्र. ९ यांचे वारस दाव्यामध्ये सामील करणे ही तांत्रीक बाब आहे. दावा मिळकती बाबत असलेले सर्व वाद एकाच दाव्यामध्ये गुणदोषावर निकाली करणे गरजेचे आहे. दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी मयत प्रतिवादी क्र. ९ यांचे वारस दाव्यामध्ये सामील करणे अत्यंत जरुरीचे आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ९ आवश्यक पक्षकार होते. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे वारसाच्या रुपात त्यांचा दावा मिळकतीमध्ये असणारा हक्क व अधिकार जीवंत राहणार आहे. दाव्याचा संपूर्णपणे व कायमस्वरुपी न्यायनिर्णय होणेसाठी मयत प्रतिवादी क्र. ९ यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजचे आहे. प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादी व प्रतिवादी यांचेतील मुळ वाद संपुष्टात येणार नाही व नवीन दावे दाखल होण्याची शक्यता निर्माण होणार आहे. सबब, मयत प्रतिवादी क्र. ९ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास वादींना परवानगी देणे न्यायोचित होईल. करीता मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीस मयत प्रतिवादी क्र. ९ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

३. वादींनी प्रस्तावित दुरुस्ती मुदतीत करुन दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

UMESHCHANDRA MADHAVRAO PATIL

Digitally signed by UMESHCHANDRA MADHAVRAO PATIL
Date: 2023.06.23 13:54:23 +0530

( **यु. एम. पाटील** )

दि. २२/०६/२०२३.

दुसरे सह दिवाणी न्यायाधीश,कनिष्ठ स्तर,
माळशिरस

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment/order :-

| | | | |
|---|---|---|---|
| **(a)** | Name of the Stenographer | **:-** | V. S. Kamble |
| **(b)** | Court | **:-** | 2nd Jt. Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, Malshiras. |
| **(c)** | Judgment/Order signed by PO on | **:-** | 22/06/2023. |
| **(d)** | Judgment/Order uploaded on | **:-** | 23/06/2023. |